NEHRU BAL PUSTAKALAYA

# आम्ही सारे भारतीय

मेहरू जे. वाडिया






ISBN 81-237-4011-5
पहिली आवृत्ती : 1984 (*शके* 1906)
सहावी आवृत्ती : 2003 (*शके* 1924)
© मेहरू जे. वाडिया
रु. 12.00
We Indians *(Marathi)*
संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

नेहरू बाल पुस्तकालय

# आम्ही सारे भारतीय




लेखन आणि चित्रे

**मेहरू जे. वाडिया**

अनुवाद

**शशांक वि. कुळकर्णी**



**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**

माझं नाव मीनाक्षी.
मी तमिळनाडूची.
माझी मातृभाषा तमिळ.
मला आमचा पोंगल सण फार आवडतो

तुझं नाव काय?







**मी आहे रामू पटेल.**
**मी गुजराथचा.**
**माझी भाषा गुजराथी.**
**मला आमचे गरबा नृत्य आवडते.**

तू किती वर्षाचा आहेस?






माझं नाव गुलाबू.
मी राजस्थानची.
रंगीबेरंगी कपडे मला फार आवडतात.
शिवाय कठपुतळीचा खेळही.
मी उंटावरून प्रवास करते.

तू कसा प्रवास करतोस?





मी बंगालचा राहाणारा.

माझं नाव बादल घोष.

मी बंगाली भाषा बोलतो.

मला संगीत आवडतं,

आणि चित्रकलाही.

मी शांतिनिकेतनमध्ये शिकतो.

तू कोठे शिकतोस?

3819



माझं नाव विठाबाई.

मी आहे महाराष्ट्रातली.

आम्ही मराठी भाषा बोलतो.

आमच्या शेजारी असमिया कुटुंब राहाते.

ते आसाममधून आलेले आहेत.

तू कोठला राहाणारा?





मी आहे सुरिंदर.


पंजाबी आहोत आम्ही.

भाषा आमची पंजाबी.


आमच्या शेजारी अमरजितसिंग राहातो.

सारखा आपला भांगडा नाच नाचत असतो.

तुला कोणता नाच आवडतो?








मी आहे नीरज त्रिपाठी.
उत्तरप्रदेशचा राहाणारा.
मी हिंदी बोलतो.
पण उर्दू भाषासुद्धा शिकत आहे.
माझ्या एका मित्राकडून.
त्याचं नाव तारिक बेग.

तू कोणती भाषा बोलतोस?





मी आहे उन्नीकृष्णन् नायर.
आम्ही राहाणार केरळचे.
आम्ही मल्याळी बोलतो,
कथकली शिकतो.
मला नारळाचं झाड फार आवडतं.


तुला कोणतं झाड आवडतं?



माझं नाव कमला.
मी आहे कर्नाटकाची.
कानडी माझी भाषा
मी मृदंग वाजवीत असते.

तू कोणतं वाद्य वाजवतेस?







मी आहे भारती.
आंध्रप्रदेशची राहाणारी.
मी तेलुगू बोलते.
उन्हाळचाची सुटी लागली की
आम्ही काश्मिरला जातो.
आमच्या मित्रांबरोबर राहातो.
त्यांची नावं,
सलमा आणि सुलेमान.

तुम्ही सुटीत कोठे जाता?









आम्ही दोघी बहिणी जोडीच्या.
राहाणार आहोत ओरिसाच्या.
आम्ही बोलतो उडिया.
आमच्या घराच्या भिंती, छतं, जमीन
रंगवलेली असते बोटांच्या ठशांनी.

तुला भाऊ बहिणी आहेत?









शेवटी आम्ही सारेजण भारतीय आहोत
आणि आम्ही भारतातच राहू.



Printed at India International Press, A-12/1, Naraina Industrial Area, Ph-I, New Delhi-28

रु. 12.00 ISBN 81-237-4011-5

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

